**आजचा सुविचार**
तुम्ही जिथे आहात
तिथून सुरुवात करा,
तुमच्याकडे जे आहे त्याचा वापर करा,
जे करू शकता ते करा.

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २७३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१५ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## महाराष्ट्रात उष्णतेची लाट आणि पावसाचे संकट, मराठवाड्यात १८ मेपर्यंत पाऊस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, छ.संभाजीनगर :** मराठवाड्यात मागील चार दिवसांपासून उष्णतेची लाट कायम आहे. आणखी दोन दिवस ही लाट कायम राहणार आहे. तसेच नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यात १५ आणि १६ मे रोजी सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडण्याचा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात १८ मेपर्यंत हलका ते मध्यम स्वरुपात पाऊस होणार आहे. चार दिवसांपासून उष्णतेची लाट तीव्र झाली असून गुरुवारीही छत्रपती संभाजीनगरसह विभागात तापमानाने उसळी घेतली होती. शहरात कमाल ४१.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. या आठवड्यात उष्णतेची लाट आणि पाऊस अशा दुहेरी संकटांचा सामना करावा लागणार आहे.



छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात १५ ते १८ मे या कालावधीत हलका ते मध्यम स्वरुपात पाऊस होणार आहे. तर नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात १५ आणि १६ मे रोजी विजांचा कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे नागरिकांना दोन्ही संकटांचा सामना करावा लागणार आहे. मागील रविवारपासून तापमानात मोठी वाढ झाली आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात उन्हाचे चटके जाणवत आहेत. दिवसा आणि रात्रीही प्रचंड उकाडा असून दुपारी रस्त्यांवर शुकशुकाट पसरला आहे. चिकलठाणा वेधशाळेच्या नोंदीनुसार मागील दहा वर्षांतील सर्वाधिक ४३.६ अंश सेल्सिअस तापमान मंगळवार, १२ मे रोजी नोंदविले गेले आहे. पश्चिमी विक्षोभांचे कमकुवत होणे, वातावरणातील कमी झालेली आर्द्रता, शुष्कता, कोरडे हवामान, मंदावलेला वाऱ्याचा वेग या प्रमुख कारणांमुळे तापमानात वाढ झाली आहे, असे हवामान अभ्यासकांनी सांगितले.

**छत्रपती संभाजीनगर शहरातील तापमानाची नोंद :**

१० मे – ४२.४ अंश
११ मे – ४३.४ अंश
१२ मे – ४३.६ अंश
१३ मे – ४३.४ अंश
१४ मे – ४१.६ अंश

**महाराष्ट्रातील या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा**

महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना १५ मे साठी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, जालना, परभणी, हिंगोली, अकोला, अमरावती, वर्धा या जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. याउलट सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित १० सदस्यांचा शपथविधी संपन्न



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, मुंबई :** विधानपरिषद सभापती प्रा.राम शिंदे यांनी विधानपरिषदेच्या १० जागांसाठी निवडून आलेल्या सर्व सदस्यांना विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची शपथ दिली.

यावेळी विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोड, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई ,आमदार रविंद्र चव्हाण आदी उपस्थित होते.

आज डॉ. नीलम गोऱ्हे, ओमप्रकाश ऊर्फ बच्चू बाबाराव कडू, अंबादास एकनाथराव दानवे, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, प्रमोद शांताराम जठार, झीशान झिआउद्दीन सिद्दिकी, माधवी संजय नाईक, सुनिल विनायक कर्जतकर, विवेक बिपिनदादा कोल्हे आणि संजय नथ्थुजी भेंडे या १० सदस्यांनी शपथ घेतली.

विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात हा शपथविधीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी सभापती प्रा.राम शिंदे यांनी सर्व नवनिर्वाचित विधानपरिषद सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

## आपत्ती काळात मुलभूत सुविधा व प्रशिक्षित मनुष्यबळाचे सुक्ष्म नियोजन करा : जिल्हाधिकारी पंत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** आपत्तीच्या काळात नागरिकांना तातडीने मदत मिळण्यासाठी सर्व विभागांनी आवश्यक मूलभूत सुविधा, साधनसामग्री आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचे सूक्ष्म नियोजन करावे. तसेच पावसाळ्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी दिले.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मान्सूनपूर्व तयारी–२०२६ आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात झालेल्या या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, महानगरपालिका आयुक्त अकुनुरी नरेश, अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकाडे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अशोक कटारे, कार्यकारी अभियंता अक्षय पगारे (सार्वजनिक बांधकाम), निलिमा मंडपे (मृद व जलसंधारण), जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सर्व विभागांनी उपलब्ध साधनसामग्रीचा साठा आणि त्यांची कार्यस्थिती तपासावी, असे सांगून जिल्हाधिकारी वसुमना पंत म्हणाल्या, जिल्हा तसेच तालुका स्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करावेत. संबंधित अधिकाऱ्यांनी पूरप्रवण भागांची प्रत्यक्ष पाहणी करावी. धोकादायक इमारती, पूल व रस्त्यांची तपासणी करून तातडीने दुरुस्ती करावयाचे नियोजन करावे. आपापल्या क्षेत्रातील अवैध होर्डिंग्ज काढावीत आणि स्थानिक स्वयंसेवकांना प्राथमिक आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण



द्यावे. आवश्यकतेनुसार एनडीआरएफ (एनडीआरएफ) आणि एसडीआरएफ (एसडीआरएफ) यांच्याशी समन्वय ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी जलद प्रतिसाद पथकांची तयारी, आपत्कालीन संपर्क यंत्रणा, वैद्यकीय सुविधा, पूरप्रवण भागातील उपाययोजना आणि जनजागृती मोहिमांवर विशेष भर देण्याच्या सूचना दिल्या. तसेच जिल्ह्यातील दुर्गम भागात कोणतीही आपत्ती उद्भवल्यास मदत, पुनर्वसन, जीवनावश्यक वस्तू आणि अन्नधान्याचा पुरवठा तातडीने करण्यासाठी प्रशासन सक्षम राहील, अशा पद्धतीने सर्व यंत्रणांनी सज्ज राहण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

## इंधन बचतीसाठी ताफा कमी करण्याची राज्यपालांची सूचना

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, मुंबई :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार पेट्रोल व डिझेलचा वापर कमी करण्याच्या आणि मर्यादित संसाधनांच्या कार्यक्षम वापरास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याच्या दृष्टीने सूचना केल्या आहेत.

राज्यपालांनी राज्य शासनाच्या गृह विभागाला विद्यमान सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन त्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या कमी करण्याची शक्यता तपासण्याचे निर्देश दिले आहेत.

गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा म्हैसकर यांना पाठविलेल्या पत्रात राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांनी राज्यपालांच्या सुरक्षेचा आढावा घेऊन ऊर्जा बचतीच्या अनुषंगाने वाहनांची संख्या निर्धारित करण्याच्या राज्यपालांच्या सूचना कळवल्या आहेत.

मर्यादित संसाधनांचा जबाबदारीने वापर करण्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्यपालांनी सदर सूचना केल्या आहेत.

## पश्चिम आशियाई संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या उपाययोजना जाहीर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१४, मुंबई :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना ऊर्जा बचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, स्वदेशी उत्पादनांना प्रोत्साहन आणि अनावश्यक खर्च टाळण्याचे आवाहन केले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने विविध विभागांसाठी महत्त्वाच्या उपाययोजना जाहीर केल्या आहेत.

राज्य शासनाच्या प्रस्तावित उपाययोजनांमध्ये परदेश दौऱ्यांवर निर्बंध, सार्वजनिक वाहतूक वापर वाढविणे, ऊर्जा बचत, नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन, तसेच डिजिटल माध्यमातून बैठका घेण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

शासकीय अधिकाऱ्यांचे परदेश दौरे तात्पुरते रद्द करण्यात येणार असून, नव्या दौऱ्यांचे नियोजन टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, वाहनांच्या वापरात कपात करून कारपूलिंग, सार्वजनिक वाहतूक आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस मेट्रो, लोकल किंवा बसने प्रवास करण्याचेही सुचविण्यात आले




आहे.

मंत्रालय स्तरावरील, विभागीय स्तरावरील व जिल्हा स्तरावरील कार्यालयीन कामकाजासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगचा वापर वाढवून बैठका, प्रशिक्षण आणि सेमिनार ऑनलाइन घेण्यावर भर देण्यात येणार आहे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांनाही याचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

ऊर्जा बचतीसाठी कार्यालयांमध्ये नैसर्गिक प्रकाशाचा वापर, अनावश्यक दिवे व उपकरणे बंद ठेवणे, तसेच वातानुकूलन यंत्रणेचे तापमान २४ ते २६ अंशांदरम्यान ठेवण्याचे निर्देश आहेत. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेअंतर्गत सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्यावरही भर देण्यात येणार आहे. इंधन बचतीसाठी पेट्रोल–डिझेलचा वापर कमी करण्याबरोबरच पीएनजी (झछन्र) गॅसचा वापर वाढविण्यासाठी प्रलंबित प्रस्तावांना तातडीने मंजुरी देण्यात येणार आहे. मुंबईसह मोठ्या शहरांतील हॉटेल्स व रेस्टॉरंट्सनाही पीएनजी वापरासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे.

खाद्यतेलाच्या वापरात कपात करण्यासाठी शासकीय कॅन्टीन, अंगणवाडी, रुग्णालये आणि वसतिगृहांमध्ये मेन्यूत बदल करण्यात येणार असून, पाम व सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा व मोहरी तेलाच्या वापराला चालना दिली जाणार आहे. आशा व अंगणवाडी सेविकांमार्फत जनजागृतीही केली जाणार आहे.

कृषी क्षेत्रात रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून नैसर्गिक, जैविक आणि सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी मोहीम राबविण्यात येणार आहे. माती परीक्षणावर आधारित पीकनिहाय मार्गदर्शन देण्यात येणार असून, खतांचा गैरवापर रोखण्यावर भर दिला जाणार आहे.

तसेच, पोलीस विभागाकडून वाहनांच्या मिरवणुका, बाईक रॅलींना परवानगी नाकारण्यात येणार असून, शासकीय जाहिराती व खर्चिक उपक्रमांवरही मर्यादा आणण्यात येणार आहेत. याशिवाय, पुढील सहा महिन्यांसाठी सल्लागारांची नियुक्ती टाळण्याचे निर्देश सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आले आहेत. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या स्वाक्षरीने हे शासन परिपत्रक जारी करण्यात आले असून सर्व विभाग, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आणि शासकीय अधिकारी–कर्मचाऱ्यांना या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## रणरणत्या उन्हात मोहरला मनमोहक गुलमोहर...



**दि.१४, लोणार :** हिंदू नववर्षाच्या आगमनाची सुरुवात ही संपूर्ण जीवसृष्टीत नवचैतन्य निर्माण करते. वैशाख महिन्यातील उन्हाळ्याचा कहर, तळपता सूर्य, वाढते तापमान, पाण्याचे दुर्भिक्ष अशा प्रतिकूल वातावरणातही काही वृक्ष–वेली फुलल्या आहेत.

उन्हाळ्यातही वृक्षांचे वेगवेगळे अविष्कार पहावयास मिळत आहेत. काही वृक्ष पूर्ण निष्पर्ण होऊन सोशिकपणे पावसाळ्याची वाट पाहतात, तर काहींची चैत्र पालवी आता गडद हिरवी होते. सावली देण्याचे काम हे वृक्ष जबाबदारीने करतात.काहींचा फळे उकलून बिया उधळण्याचा कार्यक्रम चालतो, तर गुलमोहरासारख्या वृक्षांना उन्हाळ्यात फुले येतात. ही निसर्गाची एक अदभूत किमया आहे. सध्या काँक्रीटच्या जंगलात सर्वत्र गुलमोहर बहरलेला दिसत आहे. रणरणत्या उन्हात आपले सौंदर्य टिकवून ठेवणारा वृक्ष म्हणजे गुलमोहर.

आपल्या नैसर्गिक सौंदर्यामुळे अनेकांना आकर्षित करतो. याला एप्रिल मे महिन्यात सुंदर लाल केशरी रंगाची फुले येतात. उन्हाळ्यात गुलमोहरासारखे भरभरून फुलणारे दुसरे झाड नाही. इतरवेळी उदासवाना उभा असलेला हा वृक्ष उन्हाळ्याची चाहूल लागताच इतका बदलून जातो की, तारुण्याने सळसळणाऱ्या गुलमोहराला त्याच्या लाल केशरी फुलांशिवाय त्याचे पानदेखील दिसत नाही.

घरापुढे फुललेला गुलमोहर घरावर पाखर घातल्यासारखा वाटतो. हा एका पायावर फुलांची रंगीत छत्री किंवा छत्र माणसांवर धरतो, मे– जून महिन्यात गुलमोहराला खरा बहर येतो. कधी कधी निसर्गात घडणाऱ्या काही मोहक गोष्टी सांगणारा,जाणाऱ्याचे हसतमुखाने स्वागत करणारा, मनाचा हिंदोळा झुलवणारा हा गुलमोहर आपल्या फुलांच्या पायघड्या सर्वांसाठी घालत असतो. त्याच्या फुलांनी बहरलेल्या व संकटांना न घाबरता,न खचता नेहमी हसत रहावे, हा संवेदनशीलतेचा कानमंत्र देणारा हा गुलमोहर सध्या चांगला बहरला आहे. पर्जन्यराजाच्या आगमनार्थ पहिल्या पावसा पर्यंत याची साथ टिकते.




## धक धक गर्लचा वाढदिवस

हिंदी चित्रपट सृष्टीतील सदाबहार अभिनेत्री, लाखो दिलांची धडकन, धक धक गर्ल माधुरी दिक्षितचा आज ५९ वा वाढदिवस. माधुरी दीक्षित म्हणजे हिंदी चित्रपट सृष्टीला पडलेले एक मधुर स्वप्न. आज जे ४० ते ६० या वयोगटात आहे त्यांच्यासाठी माधुरी म्हणजे सर्वस्व होते. माधुरीला पाहतच हे लोक लहानाचे मोठे झाले. मधुरीचा चित्रपट फर्स्ट डे फर्स्ट शो पाहणाऱ्यांची संख्या त्या काळात लाखोंच्या घरात होती. १५ मे १९६७ रोजी जन्मलेली माधुरी म्हणजे सुंदरता, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम. वयाच्या १७ व्या वर्षी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश करणाऱ्या माधुरीचा पहिलाच चित्रपट अबोध आपटला त्यामुळे तिच्या पदर्पणाची दखल कोणी घेतली नाही. त्यानंतर तिने काही बी ग्रेड चित्रपटातही भूमिका केल्या. उत्तर दक्षिण हा तिचा तसा पहिला व्यावसायिक चित्रपट मात्र यातीलही तिच्या भूमिकेची कोणी दखल घेतली नाही मात्र तेजाब चित्रपट आला आणि तिचे नशीबच बदलले. तेजाब चित्रपटातील एक दो तीन... हे गाणे जबरदस्त हिट झाले. या गाण्यातील तिच्या नृत्याने तरुणांना वेड लावले. या चित्रपटातील तिने साकारलेली मोहिनी नावाची भूमिका प्रेक्षक आजही रसिक विसरू शकले नाहीत. माधुरीने हा चित्रपट आपल्या अभिनय आणि नृत्याने यशस्वी करून दाखवला. या चित्रपटानंतर निर्माते दिग्दर्शक तिच्या घरी रांगा लावू लागले. सलग आठ चित्रपट फ्लॉप झालेल्या मधुरीची तेजाबच्या यशानंतर यशस्वी अभिनेत्रींमध्ये गणना होऊ लागली. या चित्रपटात तिचा नायक अनिल कपूर हा होता. ही जोडी प्रेक्षकांना खूप आवडली. पुढे या जोडीने परींदा, रामलखन, किशन कन्हैया, जीवन एक संघर्ष, जमाई राजा, खेल, बेटा, जिंदगी एक जुआ, राजकुमार, पुकार असे अनेक हिट चित्रपट दिले. माधुरीची जोडी केवळ अनिल कपूरशीच जमली असे नाही तर जॅकी श्रॉफ, मिथुन चक्रवर्ती, ऋषी कपूर, संजय दत्त, शाहरुख खान, अमीर खान, सलमान खान अशा सर्वच अभिनेत्यांशी जमली. तिने अभिनय केलेले जवळपास सर्वच चित्रपट यशस्वी झाले. तेजाब, दिल, साजन, परींदा, राम लखन, खलनायक, हम आप के है कौन, प्रेमग्रंथ, मृत्युदंड, बडे मिया छोटे मिया, बेटा, कोयला, दिल तो पागल है, देवदास हे चित्रपट तिकीट बारीवर तुफान यशस्वी ठरले. तिचे अनेक चित्रपट हिट तर काही सुपरहिट झाले. तिच्या हम आपके है कौन या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटातील तिच्या अभिनयाने आणि सौंदर्याने अनेकांना घायाळ केले. या चित्रपटातील तिची भूमिका पाहून प्रसिद्ध चित्रकार एम एफ हुसेन हे तिच्यावर इतके फिदा झाले की त्यांनी तिचे शेकडो पोर्ट्रेट बनवले यावरून त्यांना लोक त्यांना माधुरी फिदा हुसेन असे म्हणू लागले. त्यांनी तिच्यावर गजगामीनी नावाचा चित्रपटही बनवला. माधुरीच्या नावाचे गाणेही आले ( माधुरी मिली मुझे रस्ते मे...) इतकेच काय तर तिच्या नावाने चित्रपट देखील आला ( मै माधुरी दीक्षित बनना चाहती हु) तिला अनेक पुरस्कार मिळाले. प्रतिष्ठेचा फिल्मफेअर पुरस्कार तिने तब्बल पाच वेळा मिळवला. दिल, बेटा, हम आप के है कौन, दिल तो पागल है, देवदास या चित्रपटातील तीच्या भूमिकेसाठी तिला फिल्मफेअरने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार दिला. तिने राष्ट्रीय पुरस्कारही मिळवला. भारत सरकारने तिला पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले आहे. माधुरीने जवळपास ७० हुन अधिक चित्रपटात भुमीका केल्या. यातील तिच्या भूमिका आजही लोकप्रिय आहेत. लोकप्रेयतेच्या शिखरावर असतानाच तिने श्रीराम नेणे या अमेरिकास्थित उद्योगपतीशी लग्न केले. लग्नाआधी तिचे संजय दत्तशी अफेअर आहे ते दोघे लग्न करणार असे फिल्मी मासिकात छापून येत होते तिने मात्र या सर्व अफवा असल्याचे सिद्ध केले आणि लग्नानंतर थेट अमेरिका गाठली. अमेरिकेत काही वर्षे राहिल्यावर ती पुन्हा मुंबईत परतली. मुंबईत परतल्यावर तिने गुलाब गँग आणि देढ इश्कीया या चित्रपटाद्वारे पुनरागमन केले. त्यानंतर तिने टेलिव्हिजनवर झलक दीखला जा, डान्स इंडिया डान्स यासारख्या नृत्यावर आधारित रिऍलिटी शो चे जज म्हणूनही काम केले. आज इतक्या वर्षानंतरही माधुरीची जादू कायम आहे. गेल्या दोन दशकात शेकडो अभिनेत्री हिंदी चित्रपट सृष्टीत आल्या आणि गेल्या पण तिची बरोबरी करणारे तर सोडाच पण तिच्या जवळपास पोहचेल अशी एकही अभिनेत्री हिंदी चित्रपट सृष्टीला मिळाली नाही यातूनच माधुरीचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. सौंदर्य, नृत्य आणि अभिनय यांचा त्रिवेणी संगम असलेल्या सदाबहार अभिनेत्री माधुरी दिक्षितला वाढदिवसाच्या शुभेच्छा

**- श्याम ठाणेदार**

# लग्न केवळ शो नाही तर दोन कुटुंबाचा संस्काराने भावनिक क्षण!

आजच्या आधुनिक काळात लग्न समारंभांचे स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलताना दिसत आहे. पूर्वी साधेपणा, नातेवाईकांचा सहभाग आणि धार्मिक विधींना महत्त्व असायचे; मात्र आता अनेक लग्न समारंभ हे इव्हेंट किंवा शो बनताना दिसत आहेत. आकर्षक सजावट, प्री-वेडिंग शूट, ड्रोन कॅमेरे, सिनेमॅटिक व्हिडिओ आणि सोशल मीडियासाठी खास रील्स यामध्ये लग्नाचा मूळ हेतू काहीसा हरवत चालल्याची भावना अनेकांकडून व्यक्त होत आहे.

लग्न ठरवताना पत्रिका, मुहूर्त, कुटुंबाची पार्श्वभूमी, परंपरा आणि संस्कार यांना मोठे महत्त्व दिले जाते. दोन्ही कुटुंबे अनेक गोष्टींचा विचार करून हा निर्णय घेतात. मात्र प्रत्यक्ष लग्नाच्या दिवशी फोटोशूट आणि दिखाव्याच्या गोष्टींना इतके प्राधान्य दिले जाते की मुख्य विधी आणि त्यामागील भावनिक मूल्य दुय्यम ठरते. अनेकदा फोटोसाठी थांबा, पुन्हा करा, कॅमेऱ्याकडे बघा अशा सूचनांमुळे विधींमध्ये व्यत्यय येतो. परिणामी मुहूर्ताची वेळ पुढे सरकते आणि पाहुण्यांनाही समरंभ मनापासून अनुभवता येत नाही.



यामध्ये भटजींची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची ठरते. मुहूर्ताची वेळ पाळली जावी, विधी शांत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावेत यासाठी भटजींनी सुरुवातीपासूनच योग्य नियोजन आणि मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. विधी सुरू असताना नवरा-नवरीला त्या क्षणाचे महत्त्व समजावून सांगून त्यांचे लक्ष विधीकडे केंद्रित ठेवणे गरजेचे आहे. त्याचवेळी फोटोशूट, गोंधळ किंवा सततच्या सूचनांमुळे विधीमध्ये व्यत्यय येऊ नये याची काळजी घेणेही आवश्यक ठरते. विधी चालू असताना फोटोग्राफर असो किंवा कुटुंबातील सदस्य, सर्वांनी काही क्षण शांतता आणि शिस्त पाळणे हेच योग्य ठरेल. कारण त्या वेळेचा प्रत्येक मंत्र, प्रत्येक विधी आणि प्रत्येक आशीर्वाद हा केवळ औपचारिक भाग नसून आयुष्यभराच्या नात्याचा पाया असतो. अनेकदा मंडपामध्ये फोटोग्राफरांची गर्दी इतकी वाढते की पाहुण्यांना मंगलाष्टक, कन्यादान किंवा इतर महत्त्वाचे क्षण व्यवस्थित पाहताही येत नाहीत. त्यामुळे लग्नाचा पवित्रपणा आणि भावनिक वातावरण कमी होत असल्याचे जाणवते.

फोटो आणि व्हिडिओ हे आठवणी जपण्यासाठी महत्त्वाचेच आहेत. प्रत्येकालाच आपल्या आयुष्यातील खास क्षण सुंदर पद्धतीने जतन करायचे असतात. मात्र त्या आठवणी जपताना वर्तमानातील खरे क्षण जगणेही तितकेच गरजेचे आहे. लग्न हे केवळ सोशल मीडियावर दाखवण्यासाठीचे दृश्य नसून दोन व्यक्ती, दोन कुटुंबे आणि दोन संस्कार एकत्र येण्याचा अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे.त्यामुळे आधुनिकतेसोबत परंपरेचाही समतोल राखणे आवश्यक आहे. दिखावा आणि हौशी प्रकारांपेक्षा भावनिक नातेसंबंध, आशीर्वाद आणि संस्कार यांना प्राधान्य दिले गेले तरच लग्न समारंभाचा खरा आनंद आणि पवित्रता टिकून राहील.

**- चंद्रकांत सुतार,**
**माथेरान**

# आला धोंड्याचा महिना !!

## दर तीन वर्षांनी येणाऱ्या अधिक मासातील, जावई बापूंच्या सन्मानाचा मराठमोळा पवित्र सण...




**आला अधिक मास... धोंड्याचा सण देणार जावयाला सोन्याचा घास...**

आपल्या भारतीय परंपरेत आणि त्यातही हिंदू संस्कृतीत प्रत्येक नात्याचा सन्मानाने आदर केला जातो.

जेणेकरून आपसुकच प्रत्येक नात्यांमधील परस्पर ऋणानुबंध दृढ होऊन वाढीस लागतात आणि नाते अतूट विश्वासाने घट्ट बनत जाते.

जावई हे नातं तर सर्वात जास्त जिव्हाळ्याचं आणि आधाराचा धागा असलेलं नातं, जे फार पूर्वीपासून सर्वच नातलगांनी आदराने सन्मानित करून जोपासण्यात आलेलं नातं.

तशी तर सगळीच नाती शब्दातून सांगण्यापेक्षा प्रतिकातून,उत्सवातून आणि काही प्रासंगिक माध्यमातून विषद करण्याची पध्दत आपल्या हिंदू संस्कृतीत फार पूर्वीपासून चालत आली आहे.

आता काळानुरूप त्यात थोडाफार बदल पहायला मिळतोय.

म्हणूनच काळ बदलला तशी सर्वच सणांची आणि उत्सवांची पद्धत देखील बदलत गेली.

आता प्रत्येक सणाला वाण देण्याच्या पद्धती सुद्धा बदलत गेल्या. वाण म्हणजे एखाद्या नात्याच्या सन्मानार्थ आदराने दिलेली भेट.

आज काळाच्या ओघात पद्धती जरी बदलत असल्या तरी नात्यांमधील गोडवा,प्रेम आणि परस्परांमधील आपुलकी आजही अतूट असल्याचे सर्वत्र पहावयास मिळत आहे.

आपल्या मराठमोळ्या संस्कृतीत साजरा केला जाणारा असाच एक महत्त्वपूर्ण सण म्हणजे धोंड्याचा सण....

दर तीन वर्षांनी येणाऱ्या पवित्र अधिक मासात येणारा आणि लग्नानंतर प्रत्येक मुलीच्या आयुष्यातील सासर व माहेर या दोन्ही घरांना अधिकाधिक जवळ आणून जावई राजाला मान, सन्मान आणि सोन्याचा घास मिळवून देणारा एक आगळा वेगळा पारंपरिक सण....

बदलत्या काळानुसार हल्लीच्या आधुनिक युगात देखील या धोंड्याच्या महिन्यात म्हणजेच अधिक मासात असाच मान सन्मान मिळविणारे एक हळुवार नाते म्हणजे मुलीचे सासु-सासरे आणि जावयाचे...

आपल्या मुलीला सासरच्या वातावरणात प्रेमाने सांभाळून घेणारा जावई, हा प्रत्येक मुलीच्या मातापित्यांना 'नारायणा' समान भासतो.

म्हणूनच भगवान विष्णूच्या या पुरुषोत्तम मासात जावयाला लेकीसह घरी आदरतिथ्य करताना योग्य मान सन्मान करून वाण दिले जाते.

श्रावण मासाप्रमाणे या अधिक मासाला देखील धार्मिक, पौराणिक आणि भौगोलिक दृष्ट्या हिंदू संस्कृतीमध्ये मानाचे आणि महत्वाचे स्थान दिले गेले आहे.

या पवित्र महिन्यात भगवान विष्णूची पूजा, पुरुषोत्तम कथेचे वाचन, श्री भागवत कथा,कीर्तन आणि महोत्सव आयोजित केले जातात.तसेच गुरुचरित्राचे देखील परायण केले जाते.

या दरम्यान सामूहिक दान धर्माचे कार्यक्रम देखील आयोजित केले जातात. यामध्ये प्रामुख्याने अन्नदान आणि वस्त्र दानाला महत्व असते. याच महिन्यात नवीन विवाहितांसाठी तर विशेष उत्साह असतो.

ज्यांचे नुकतेच लग्न झालेले आहे अशा जोडप्यांसाठी हा सण म्हणजे एक पर्वणीच असते. त्यांच्यासाठी एकतर हा पहिलाच अधिक मास आणि धोंडा सण असल्याने जावईबापूला आणि त्याच्या घरातील सर्व लहानथोरांना मुलीच्या माहेरी सन्मानाने बोलावून मोठा पाहुणचार आणि आदरतिथ्य केले जाते.

थोडक्यात सांगायचे झाले तर धोंडा सण म्हणजे आधुनिक काळात देखील आपली संस्कृती,परंपरा तथा नातेसंबंध यांचा धार्मिक दृष्ट्या अनोखा संगम साधणारा एक आनंदोत्सव असतो.

वसिष्ठ सिद्धांताप्रमाणे अधिक महिना हा ३२ महिने १६ दिवस आणि ८ तासांनंतर येतो. यानुसार पाहिलं तर ३३ महिन्यांनंतर अधिकचा महिना येतं असतो.दर तीन वर्षे झाल्यानंतर ३३ दिवसांचा फरक येतो त्याला एक वाढीव महिना गणला जाऊन अधिकमास दर तीन वर्षांनी येतो. हा महिना अतिरिक्त असल्याने यामध्ये कोणतेही शुभकार्य केले जात नाही या महिन्याकडे निष्काम म्हणूनच पाहिले जाते. त्यामुळे पूर्वी या महिन्याला धोंडा, दगड असे म्हणायचे.

तीन वर्षानंतर येणाऱ्या या अतिरिक्त किंवा अधिक महिन्यात ३३ अंकाला अतिशय महत्त्व आहे.जावयाचा सन्मान करताना या सणाच्या दिवशी आदरतिथ्य करताना मोठ्या सन्मानाने ३३ दिव्यांनी ओवाळून ३३ अनारसे तथा पुरणाचे धोंडे वाण म्हणून देण्याची परंपरा आहे.

शिवाय या दिवशी ३३ वस्तूचं दान,३३ जणांना अन्नदान, ३३ जोडप्यांसह सामुहिक पूजा करण्याची देखील रीत आहे. वैदिक ज्योतिष शास्त्रानुसार जावयाला या पवित्र अधिक महिन्यात घरी बोलवल्यानंतर ३३ अनारसेच्या वाणासोबतच एक चांदीचा अथवा तांब्याचा निरंजन दिवा देणं अतिशय शुभ मानलं जातं. असं म्हणतात की चांदीचं तथा तांब्याचं निरंजन दिल्यामुळे माता लक्ष्मी प्रसन्न होते. लक्ष्मी प्रसन्न म्हणजे अर्थातच नारायण प्रसन्न...

याचाच अर्थ आपली मुलगी प्रसन्न आणि जावई देखील प्रसन्न...

त्यामुळे लेकीच्या सुखासाठी जावयाला चांदीचं अथवा तांब्याचं निरंजन द्यावं असं म्हणतात. तसेच हे देताना जावयला ३३ दिव्याने औक्षण करण्याची देखील परंपरा आहे. म्हणूनच या सणाला जावयाला ३३ दिव्यांनी सन्मानाने आणि आदराने ओवाळले जाते.या नंतर हेच औक्षणाचे ताट आणि नवीन कपड्यांचा आहेर व वाण म्हणजेच भेट वस्तु दिली जाते.

याच वेळी जावयाच्या घरातील वडीलधाऱ्यांचाही योग्य सन्मान करून त्यांनाही नवीन पोशाख दिला जातो.

आपल्या लेकीला देखील हळदकुंकू लावून ओवाळले जाते. तिची साडीचोळीने ओटी भरून तिलाही या क्षणी भेट वस्तु दिली जाते.तदनंतर या लक्ष्मी नारायणाच्या जोडीला मनोभावे नमस्कार केला जातो.

आपल्या संस्कृतीत मुलीचे आईवडील जावई किंवा लेकीच्या कधीच पाया पडत नाही, परंतु या सणाला मात्र आपण त्यांना लक्ष्मी नारायणाचे स्वरूप मानतो हे लक्षात घेऊन दोघांची मनोभावे पूजा केली जाते व त्यांना अशाप्रकारे वाण देऊन त्यांचा आदराने मान सन्मान केला जातो.

यानंतर घरात बनविलेले पुरणाचे धोंडे व इतर मिष्ठान्न जेवणासोबत वाढून जावयासह त्याच्या घरातील मंडळींना मेजवानी देऊन त्यांचेही आदरतिथ्य केले जाते.

शेवटी सर्व कार्यक्रम आटोपल्यानंतर निरोप घेताना दोन्ही घरातील वडीलधारे एकमेकांना आलिंगन देऊन मुलीच्या सासरची मंडळी कडून दोन्ही घरात असाच सलोखा यापुढीही ठेवून मुलीला सतत आनंदी ठेवण्याचे आश्वासन देऊन धोंड्याच्या या आनंदोत्सवाचा समारोप करतात.

अशा प्रकारे प्रत्येक मुलीच्या आयुष्यातील माहेर आणि सासर या दोन सोयऱ्यांच्या नात्यांचे ऋणानुबंध प्रगल्भ करून दोन्ही घरांचे हितसंबंध अधिक जिव्हाळ्याने जोपासणाऱ्या या मराठमोळ्या अधिक मासाचा सण आणि याच येणारा धोंड्याच्या सण दोन दिवसानंतर म्हणजे येत्या रविवार पासून १७ मे पासून सुरू होत असून १५ जून २०२६ रोजी त्याचा समारोप होईल.

याचाच अर्थ असा आहे की, या वर्षी दोन ज्येष्ठ महिने आले आहेत, एक आहे नियमीत येणारा तर दुसरा आहे अतिरिक्त ज्येष्ठ महिना.

या अतिरिक्त तथा अधिक महिन्याच्या कारणास्तव या वर्षात काही सण पुढे जाणार आहेत.याचाच एक भाग म्हणून या वर्षी वटपौर्णिमा देखील २९ जून रोजी आहे.

**: संकलन :**
**संजय पंडित**

## स्वामीनाथन

हरितक्रांतीचे जनक
डॉक्टर स्वामीनाथन
गेले रे चटका लावून
वेदनादायक निधन

शेतीला सक्षम करा
जल स्त्रोत पुनर्भरण
पाणी अडवा जिरवा
योग्यजागी हो धरण

समृध्दीचा खरा मंत्र
गावपातळीनियोजन
सामुदायिक शेतीतून
वृध्दींगत हो उत्पादन

शेती मालावर प्रक्रिया
करी सार्थ मूल्य वर्धन
सुलभकर्ज योग्य दरा
खत बियाणे संशोधन

खरा विकास देशाचा
बळीराजा बनो सधन
शेतीस दर्जाउद्योगाचा
अत्याधुनिक हे साधन

आधारभूत किमतीला
जबाबदार ते प्रशासन
हमीभाव योग्य समयी
सांभाळ करे सुशासन

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## दिवाळी बोनस, सानुग्रह अनुदान, पेन्शन योजना व खाजगीकरण विरोधात द्वारसभा संपन्न




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१४, नागपूर :** महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अधिकारी, अभियंते कृती समितीच्या वतीने कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी तसेच दिवाळी बोनस, सानुग्रह अनुदान, पेन्शन योजना लागू करणे आणि वीज कंपन्यांच्या खाजगीकरणाच्या निर्णयाविरोधात औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा येथील चेमरी गेटसमोर भव्य द्वारसभेचे आयोजन करण्यात आले. द्वारसभेला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष मोहन शर्मा उपस्थित होते. त्यांनी सभेला संबोधित करताना सांगितले की, वीज कर्मचाऱ्यांच्या न्याय्य व रास्त मागण्या व्यवस्थापनाने तात्काळ मान्य कराव्यात. दिवाळी बोनस, सानुग्रह अनुदान व पेन्शन योजना कर्मचाऱ्यांना देणे हा त्यांचा हक्क असून, शासनाने याबाबत कोणतीही दिरंगाई न करता सकारात्मक निर्णय घ्यावा. तसेच वीज क्षेत्रातील वाढते खाजगीकरण हे कर्मचारी, शेतकरी, ग्राहक व सर्वसामान्य जनतेच्या हिता विरोधात असल्याचे त्यांनी नमूद केले. सार्वजनिक क्षेत्रातील वीज कंपन्या सक्षम ठेवण्यासाठी सरकारने योग्य धोरण स्वीकारावे, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला.

सभेत वर्कर्स फेडरेशनचे झोन अध्यक्ष विवेक गुंडरुकवार यांनी प्रास्ताविक केले. तसेच मागासवर्गीय संघटनेचे निलेश गजभिये, सबऑर्डिनेट इंजिनिअर असोसिएशनचे कुणाल मराठे, वीज कामगार महासंघाचे निलेश चरपे आणि ग्रॅज्युएट इंजिनीयर असोसिएशनचे चंद्रशेखर वंजारी इत्यादी पदाधिकाऱ्यांनी ही कर्मचाऱ्यांच्या समस्या, सेवा अटी, आर्थिक हक्क व भविष्यातील आंदोलनाची दिशा याबाबत मनोगत व्यक्त केले. सभेत उपस्थित कर्मचाऱ्यांनी विविध घोषणाबाजी करून आपल्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला.

द्वार सभेचे संचालन प्रल्हादजी तिखाडे आणि आभार प्रदर्शन कुलदीप खोब्रागडे यांनी केले. या आंदोलनात्मक द्वारसभेला औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा येथील मोठ्या संख्येने कर्मचारी, अधिकारी, अभियंते व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी एकजुटीने लढा उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमाचा समारोप संघटनेच्या घोषणांनी व आगामी आंदोलन अधिक व्यापक करण्याच्या निर्णयाने करण्यात आला.

## माथेरान नगर परिषदेतर्फे २० मे रोजी मिनी मॅरेथॉन स्पर्धेचा आयोजन




**अक्षराज: चंद्रकांत सुतार**

**दि.१४, माथेरान :** माथेरानच्या वाढदिवसानिमित्त माथेरान नगर परिषदेतर्फे बुधवारी दि. २० मे रोजी सकाळी ७ वाजता मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इतिहास, पर्यटन आणि आरोग्यदायी जीवनशैली यांचा संगम साधण्याच्या या स्पर्धेमध्ये नागरिक, विद्यार्थी, महिला तसेच क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी केले आहे.ब्रिटिश अधिकारी ठाण्याचे कलेक्टर मॅलेट यांनी २१ मे १८५० रोजी माथेरानला पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यास सुरुवात केली होती. त्या ऐतिहासिक दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी २१ मे हा दिवस माथेरानचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात येतो. यंदाही विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्याअंतर्गत मिनी मॅरेथॉन स्पर्धा विशेष आकर्षण ठरणार आहे.स्पर्धेमध्ये सर्वांसाठी खुल्या गटासाठी ७ किलोमीटर मॅरेथॉन आयोजित करण्यात आली असून विजेत्यास २० हजार रुपये, उपविजेत्यास १० हजार रुपये तर तृतीय क्रमांकासाठी ५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. तसेच चौथा, पाचवा आणि सहावा क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकांना प्रत्येकी १ हजार रुपये, आकर्षक ट्रॉफी आणि प्रशस्तिपत्र देण्यात येणार आहे.याशिवाय इयत्ता ७ वी ते १० वीतील शालेय विद्यार्थी मुला-मुलींसाठी स्वतंत्र ३ किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महिलांसाठी खुल्या गटात दीड किलोमीटर चालण्याची स्पर्धा ही ठेवण्यात आली आहे. या तिन्ही गटांमध्ये विजेत्यास १० हजार रुपये, उपविजेत्यास ५ हजार रुपये, तृतीय क्रमांकासाठी ३ हजार रुपये आणि चौथा, पाचवा व सहावा क्रमांक मिळविणाऱ्यांना प्रत्येकी १ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी उपनगराध्यक्ष संतोष शेलार (मो. ८७९३३११०४४), नगरसेविका अर्चना भिलारे (मो. ९६७३०८०९०१) तसेच नगरसेविका रिझवाना शेख (मो. ८०८७४३३८५६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.माथेरानच्या निसर्गरम्य वातावरणात आयोजित करण्यात आलेली ही स्पर्धा आरोग्य, पर्यटन आणि सामाजिक एकात्मता यांना चालना देणारी ठरणार असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## राजुऱ्यात घरफोडी; अंदाजे ६ लाखांचे सोन्या - चांदीचे दागिने लंपास



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि. १४, राजुरा (चंद्रपूर) :** शहरातील शिवाजी नगर वार्ड क्रमांक ९ मधील पाण्याच्या टॉकीजवळ अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे सहा लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना दिनांक ९ मे ते ११ मे २०२६ दरम्यान घडल्याचे समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, घरमालक मुसा शेख यांच्या घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील कपाट व बेडची तोडफोड करून घरातील मौल्यवान दागिन्यांवर डल्ला मारला. चोरीस गेलेल्या दागिन्यांमध्ये अंदाजे ३.२ तोळे सोने व २० तोळे चांदी, तसेच इतर मौल्यवान वस्तूंचा समावेश असून एकूण किंमत अंदाजे ६ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. तसेच अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात करण्यात आली आहे.

तपासादरम्यान, फिंगर प्रिंट, फॉरेन्सिक पथक, श्वान पथक तसेच परिसरातील आणि शहरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी घरांच्या सुरक्षेबाबत अधिक जागरूक राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा वेगाने तपास करून चोरीस गेलेले दागिने परत मिळवावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. मुसा शेख यांचे गृह कर्ज आहे. अश्यातच घरफोडीने संपूर्ण परिवारावर आर्थिक संकट कोसळले असून भीतीचे वातावरण आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुंबई, लातूरची विजयी घोडदौड सुरू

**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१४, बदलापूर :** छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत यजमान मुंबईसह कोल्हापूर, लातूरच्या संघांनी अपेक्षेप्रमाणे विजयी सलामी दिली. पुण्याच्या मुलींच्या दोन्ही संघाने चमकदार कामगिरीचे प्रदर्शन घडवित दिवस गाजवला.

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा बदलापूर जिमखाना मैदानावर रंगली आहे.

कडक उन्हामुळे संध्याकाळी विद्युतप्रकाश झोतात रंगलेल्या या स्पर्धेचा पहिला दिवस पुणे संघाने गाजविला. पुणे संघाच्या मुलींच्या दोन्ही संघाने विजयश्री प्राप्त केली. १८ वर्षांखालील मुलांच्या गटातील अटीतटीच्या लढतीत पुणे संघाने नाशिकचा २५-२०, २५-२१ गुणांनी पराभव करून गटात अव्वल स्थानावर झेप घेतली आहे.

साखळी पध्दतीने १८ व २१ वर्षांच्या मुला-मुलींच्या स्पर्धेत दोन गटात स्पर्धा सुरू रंगली आहे. २१ वर्षांखालील मुलांच्या गटात यजमान मुंबईने नाशिकला २५/१०, २५/१२ गुणांनी नमवले. सामन्यात मुंबई संघाने सुरुवातीपासून आपली पकड कायम राखत विजयी वाटचाल सुरू केली आहे. या गटातील दुसऱ्या साखळी लढतीत लातूरने कोल्हापूरवर २५/१५, २५/१० गुणांनी मात करीत विजयाचा झेंडा रोवला. १८ वर्षांखालील मुलींच्या गटातही लातूरने नाशिकचा २५/६, २५/११ गुणांनी धुव्वा उडवित मैदान गाजवले. मुलांच्या १८ वर्षांखालील गटातील पुणे विरूध्द नाशिक ही लढत शेवटच्या मिनिटापर्यंत चुरशीची झाली.

सुरुवातीपासून पुणे संघाने आक्रमक खेळ करीत आघाडी घेतली. पुण्याचा कर्णधार अनुज जोशीने मध्यरेषेवरून खेळताना जोरदार स्मॅशेस मारून गुणांची खाते उघडले. पाठोपाठ ओम झगडेने जोरदार प्रतिकार करीत तर स्वानंद राजोपाध्यने सुरेख पास करीत सामन्यावर वर्चस्व कायम राखले. नाशिक संघाने चिवट झुंज दुसऱ्या सेटमध्ये ही अपुरी ठरली.

पुणे संघाच्या मुलींनी १८ व २१ वर्षांखालील दोन्ही गटातील लढती जिंकून आपली विजयी दावदारी दाखवली. २१ वर्षांखालील गटात पुणे संघाने लातूरवर २५/११, २५/१६ गुणांनी सहज मात केली. १८ वर्षांखालील गटात गटात पुणे संघाने संभाजीनगरवर २५/८, २५/१० गुणांनी एकतर्फी विजय संपादन केला.



### अटीतटीच्या लढतीत पुण्याची नाशिकवर मात

### खेळाडूंसाठी चक्क रिसोर्टमध्ये निवासव्यवस्था

शासकीय स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच सर्व खेळाडूंची निवासव्यवस्था ही चक्क रिसार्टमध्ये करण्यात आली आहे. बदलापूरमधील सर्वच रिसोर्ट व्हॉलीबॉल स्पर्धेमुळे बुक झाले आहे. प्रथमच उत्तम दर्जाची निवास व्यवस्थेमुळे खेळाडू बदलापूरच्या पाहुणचाराचे कौतुक करीत आहेत. क्रीडा व युवक सेवा संचालनालय व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद हे एकत्रितपणे हा रिसार्टसाठी खर्च करणार असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनंतर आरामदायी निवास व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे.

# आदिवासी जनसंवाद यात्रेतून भाजपा संघटन बळकट करण्याचा निर्धार

## भाजपा आदिवासी मोर्चाची जिल्हास्तरीय बैठक उत्साहात; बूथ बांधणी, जनगणना व रोजगार प्रशिक्षणावर भर

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१४, जव्हार (पालघर) :** भाजपा आदिवासी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार देवराव होळी यांच्या आदिवासी जनसंवाद यात्रेनिमित्त पालघर जिल्ह्यातील जव्हार येथील साई महल हॉलमध्ये भाजपा आदिवासी मोर्चाची जिल्हास्तरीय संघटनात्मक बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीत पक्ष संघटन मजबूत करणे, बूथ समीकक्षीकरण, जनगणना, एस.आर. आय. तसेच आदिवासी समाजाशी संबंधित विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

या बैठकीस विक्रमगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरिश्चंद्र भोये, बाबाजी काठोले, आदिवासी मोर्चा जिल्हाध्यक्ष ज्योती भोये, प्रकाश निकम, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सुरेखा थेतले,भाजपा महाराष्ट्र राज्य परिषदेचे सदस्य सुरेश पाडवी, सुरेश शिंदा, विजया लहारे, मधू खुताडे, विनोद मेढा, लुईस काकड, संतोष पाटील, विठ्ठल थेतले, संदीप गोवारी, रवींद्र भडंगे, अशोक चौधरी, पूजा उदावत, आदी मान्यवर उपस्थित होते.

बैठकीदरम्यान पालघर जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना प्रदेशाध्यक्ष डॉ.देवराव होळी, आमदार हरिश्चंद्र भोये आणि जिल्हाध्यक्ष ज्योती भोये यांच्या हस्ते नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. देवराव होळी यांनी आगामी काळात भाजपा संघटन अधिक मजबूत करण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने बूथ स्तरावर सक्रिय राहण्याचे आवाहन केले. जनगणना प्रक्रियेत आदिवासी समाजाची अचूक नोंद होणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी समाजामध्ये जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला. तसेच एस.आर.आय. संदर्भातील विविध बाबी, आदिवासी समाजाचे प्रश्न आणि शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्नशील राहावे, असे त्यांनी सांगितले.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विविध समस्या पक्षस्तरावर बैठका घेऊन सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, अशी ग्वाही ही त्यांनी दिली. तसेच २५ ते ३५ वयोगटातील युवक-युवतींसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. आदिवासी सेवा सहकारी संस्था, जंगल कामगार सोसायटी आणि शेतकी सोसायट्यांमध्ये आदिवासी समाजाचा अधिक सहभाग वाढवून शासनाच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन ही त्यांनी केले. पंचसूत्री कार्यक्रमांतर्गत कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण संरक्षण, नागरी कर्तव्य आणि स्वजागृती या माध्यमांतून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.



बैठकीत उपस्थित मान्यवरांनीही मनोगत व्यक्त करत आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा कटिबद्ध असल्याचे सांगितले. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बूथ सक्षमीकरण प्रभावीपणे राबविणे, नवीन कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणे आणि संघटनात्मक कार्यक्रम गावागावात पोहोचविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. कार्यक्रमानंतर कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे दिसून आले. आदिवासी जनसंवाद यात्रेमुळे पक्ष संघटनाला अधिक बळ मिळत असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. या बैठकीस पालघर जिल्ह्यातील शेकडो कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील - केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव

## मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, बुलढाणा :** बुलढाणा हा शैक्षणिकदृष्ट्या मागे असला तरी, आता जिल्ह्यात मॉडेल डिग्री कॉलेज, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि कृषी महाविद्यालयासारख्या संस्था उभ्या राहत आहेत. या शैक्षणिक व पायाभूत सुविधांमुळे जिल्ह्याचा कायापालट होणार असून, सर्वांगीण विकासासाठी आम्ही सर्व लोकप्रतिनिधी कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित बिरसिंगपूर येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते पार पडले, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वित्त व लेखा अधिकारी सीए पुष्कर देशपांडे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉक्टर नागरे, मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ.ए.आर. म्हळसने, कार्यकारी अभियंता जे.एन. काळे, पोलीस उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील तसेच बिरसिंगपूरच्या सरपंच वैशाली शिंदे आदी उपस्थित होते.केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव म्हणाले की, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून आज महाविद्यालयाच्या इमारतीच्या कामाला सुरुवात होत आहे.

या महाविद्यालयामुळे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी उत्तम सोय उपलब्ध होणार आहे. सुसज्ज इमारतीसोबतच येथे स्विमिंग पूल, क्रीडांगण यांसारख्या आधुनिक सुविधा निर्माण केल्या जातील. यातून गुणवंत विद्यार्थी घडतील आणि जिल्ह्याचा नावलौकिक वाढेल. तसेच, सध्याच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीचा विचार करता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनाचे सर्वांनी पालन करावे, असेही त्यांनी नमूद केले.आमदार संजय गायकवाड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागत होते. परंतु आता मॉडेल डिग्री कॉलेजमुळे जिल्ह्यातच गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध होणार असल्याचे सांगितले.



महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम उच्च दर्जाचे व्हावे, अशा सूचनाही त्यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. भूमिपूजन सोहळ्याचे अध्यक्षीय भाषण संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी, तर सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले.

अक्षराज



# राष्ट्रीय आरोग्य अभियानाला ५ वर्षाची मुदतवाढ द्या

## खासदार धानोरकर यांची केंद्र सरकारकडे मागणी; ४० हजार कर्मचाऱ्यांचे भवितव्य धोक्यात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१४, चंद्रपूर :** केंद्र सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय आरोग्य अभियान योजनेला केवळ ६ महिन्यांची अल्प मुदतवाढ दिल्याने कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या अन्यायकारक निर्णयाची गंभीर दखल घेत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी केंद्रीय आरोग्य मंत्र्यांना पत्र लिहून या अभियानाला तात्काळ ५ वर्षाची मुदतवाढ देण्याची आग्रही मागणी केली आहे.

भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाने २९ एप्रिल २०२६ रोजी जारी केलेल्या अधिकृत पत्राचा संदर्भ देत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी नमूद केले कि,



वित्त मंत्रालयाच्या सूचनेवुसार ही मुदतवाढ केवळ ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत देण्यात आली आहे. यापूर्वी २०१२ पासून या अभियानाला सलग ५ -५ वर्षाची मुदतवाढ देण्यात येत होती. मात्र, यंदा प्रथमच केवळ ६ महिन्यांची अंतरिम मुदतवाढ देऊन १६ व्या वित्त आयोगाच्या चक्रात या योजनांचे भवितव्य टांगणीला लावले आहे. ही बाब अत्यंत खेदजनक आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान ही ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य व्यवस्थेचा कणा असून, याअंतर्गत लसीकरण, कुपोषण निर्मूलन, माता-बाल मृत्यू दर कमी कमी करणे आणि प्राथमिक आरोग्य सेवा बळकट करणे यासारखी अत्यंत महत्वाची कामे केली जातात. या मोहिमेत कार्यरत असलेले डॉक्टर, स्टॉफ नर्स, एएनएम, लॅब टेक्निशियन, आणि इतर कर्मचारी गेल्या १० ते १५ वर्षांपासून सातत्याने सेवा देत आहेत. विशेषत: कोविड-१९ सारख्या महाभयंकर संकटात आपल्या प्राणाची बाजी लावून सेवा देणाऱ्या या कर्मचाऱ्यांना आता असुरक्षिततेत ठेवणे अत्यंत अयोग्य आहे. 'ज्या कर्मचाऱ्यांनी संकटकाळात देशाला साथ दिली. त्यांच्या भविष्याशी खेळणे थांबवावे. केवळ ६ महिन्यांची मुदतवाढ देणे म्हणजे ४० हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवण्यासारखे आहे', असे मत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी व्यक्त केले आहे.

केंद्र सरकारने तातडीने या निर्णयाचा पुनर्विचार करुन, वित्त आयोगाच्या शिफारशींची वाट न पाहता एन.एच.एम ला पूर्वीप्रमाणेच पुढील ५ वर्षांसाठी तात्काळ मुदतवाढ द्यावी आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवेबाबत ठोस व सुरक्षित धोरण निश्चित करावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे.

# तापमानवाढी संदर्भात नगरसेविका शिंदे यांचे नगरपंचायत प्रशासनाकडे निवेदन

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१३, शहापूर (ठाणे) :** गेल्या काही दिवसांपासून शहापूरच्या तापमानवाढीचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. याच संदर्भात नगरसेविका रजनी शिंदे यांनी नगरपंचायत प्रशासनाकडे निवेदन सादर केले असून, पाणी बचत तसेच भुजल पुनर्भरण केले जावे, नवीन इमारत बांधकामांना परवानगी देतांना रेन हार्वेस्टिंग सिस्टम सक्तीची करावी तसेच जुन्या ईमारतींना याबाबत प्रोत्साहित करावे, शहापूर नगरपंचायत हद्दीतील कुपनलिकांचे पुनर्भरण करुन जल पातळी वाढविण्यासाठी तांत्रिक ऊपाययोजना करावी, पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनींतुन होणारी गळती थांबवावी, उपलब्ध मोकळ्या जागांवर 'मियावाकी' पद्धतीने वृक्षलागवड करावी, प्रत्येक घरासाठी 'एक घर एक झाड' ही योजना राबवावी, रस्त्याच्या कडेला सावली देणारी वृक्ष लागवड करण्यात यावी, नगरपंचायत हद्दीतील सर्व इमारतींच्या छतांवर पांढरा रंग लावण्यात यावी, जेणेकरून तापमानात काही प्रमाणात घट होऊ शकते, सार्वजनिक ठिकाणी नागरिकांसाठी थंड पाण्याची व्यवस्था करावी, शहरासाठी हिट ॲक्शन प्लॅन तयार करावा अशा विविध मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

याच संदर्भात काही दिवसांपूर्वी शहापूर पर्यावरण रक्षण मंचा च्या वतीने खासदार सुरेश (बाळ्या मामा) म्हात्रे यांची देखील भेट घेऊन त्यांना निवेदन दिले होते. खासदार म्हात्रे यांनी याबाबत जिल्हाधिकारी ठाणे यांची भेट घेऊन याप्रश्नी मुख्य कार्यकारी अधिकारी जिप ठाणे, वन विभाग अधिकारी शहापूर, सामाजिक वनीकरण विभाग, मुख्य अभियंता एमएसआरडीसी, मुख्य अभियंता एन.एस.ए.आय, तहसीलदार शहापूर, मुख्य अधिकारी शहापूर नगरपंचायत, वरिष्ठ अधिकारी एमआयडीसी, वरिष्ठ अधिकारी रोजगार हमी योजना, अधिक्षक अभियंता जलसंपदा विभाग, अधिक्षक अभियंता बांधकाम विभाग, गटविकास अधिकारी पंचायत समिती शहापूर यांची संयुक्त बैठक बोलवावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडून छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, बुलढाणा :** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौक परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात जन्मोत्सव सोहळा पार पडला. यावेळी केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



बुलढाणा शहरातील जयस्तंभ चौक येथे छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात आले असून, आज सकाळी पारंपरिक पद्धतीने जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी संभाजी महाराजांच्या पुतळ्याला पंचामृताने अभिषेक करण्यात आला. तसेच एका बालकाला संभाजी महाराजांच्या रूपात पाळण्यात ठेवून सुवासिनींनी पाळणागीत गायले व त्याचे 'संभाजी राजे' असे नामकरण करण्यात आले. यानंतर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी स्मारकातील पुतळ्यास पुष्पमाल्य अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमास आमदार संजय गायकवाड, नगराध्यक्षा पूजा गायकवाड, नगर परिषदेचे गटनेते मृत्युजय गायकवाड, ओमसिंग राजपूत, सोनू जाधव यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जून - जुलै २०२६ मध्ये होणार दहावी-बारावी पुरवणी परीक्षा; वेळापत्रक जाहीर

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जून-जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) पुरवणी परीक्षा तसेच प्रात्यक्षिक परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर केले आहे.राज्य मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेण्यात येणार आहेत.जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार बारावीची लेखी परीक्षा दि.२६ जून ते ८ जुलै २०२६ या कालावधीत होणार असून दहावीची लेखी परीक्षा दि. २६ जून ते ३० जून २०२६ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. तसेच प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा देखील याच कालावधीत पार पडणार आहेत. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/ उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांच्याकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरुनच परीक्षेच्या तारखांची खात्री करुन घ्यावी व परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच सोशल मिडिया किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरु नये. यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास मंडळ जबाबदार राहणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

# एन.एम.एम.टी. कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचे पाऊल

**अक्षराज : अमोल सूर्यवंशी**

**दि.१४, खारघर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम घणसोली आगार येथे कर्मचाऱ्यांसाठी सर्व उपकरणांनी सुसज्ज अशा व्यायाम शाळेचे उद्घाटन पार पडले. दिवसभर धावपळ करणाऱ्या परिवहन कर्मचाऱ्यांचे




शारीरिक आरोग्य सुदृढ राहावे, या उद्देशाने ही सोय करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांचा कार्यक्षमतेत वाढ व्हावी यासाठी उचललेले हे पाऊल खरोखरच कौतुकास्पद आहे. नवी मुंबईच्या महापौर सुजाता सुरज पाटील, माजी खासदार संजीव नाईक यांची यावेळी विशेष उपस्थिती लाभली.

# माटरगाव येथे आज 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर'

## नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, बुलढाणा :** महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार शेगाव तालुक्यातील माटरगाव मंडळात शुक्रवार, दि. १५ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता जि.प. हायस्कूल, माटरगाव बु. येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये नागरिकांना महसूल, कृषी, आरोग्य, पुरवठा, निवडणूक व विविध शासकीय योजनांशी संबंधित सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. शिबिरात ७/१२ व ८-अ उताऱ्यांचे वाटप, विविध फेरफार नोंदी, जिवंत ७/१२ अंतर्गत नोंदी, विस्तारित जिवंत ७/१२ योजनेअंतर्गत अर्ज स्वीकारणे, सलोखा योजना तसेच पी.एम. किसान योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांचे लँड सीडिंग करण्यात येणार आहे. याशिवाय नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांचे ई-केवायसी, फेरफार अदालत, ॲग्रीस्टॅक अंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक तयार करणे, ई-हक्क प्रणाली अंतर्गत अर्ज स्वीकारणे, ई-पीक पाहणी, ई-चावडीद्वारे जमीन महसूल वसुली आदी सेवा देण्यात येतील.

शिबिरात नवीन आधार नोंदणी व आधार अद्ययावत करणे, उत्पन्न, जात, नॉन-क्रीमीलेयर, राष्ट्रीयत्व, वय व अधिवास प्रमाणपत्रांसाठी ई-अर्ज स्वीकारले जाणार आहेत. तसेच संजय गांधी योजना, रेशनकार्ड संदर्भातील अर्ज, नवीन मतदान ओळखपत्र नोंदणी व दुरुस्ती, आधार-मतदान जोडणी अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.

आरोग्य विभागामार्फत आभा कार्ड, डिजिटल हेल्थ कार्ड, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजना संदर्भातील अर्ज प्रक्रिया करण्यात येणार आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांसाठी अर्ज स्वीकारणे, शेततळे योजना, पंतप्रधान आवास योजना व इतर घरकुल योजनांचे अर्ज तसेच जन्म, मृत्यू व विवाह नोंदणी प्रमाणपत्रांसाठी अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

या शिबिरांचा माटरगाव मंडळातील सर्व नागरिकांनी तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन शेगाव तहसीलदार यांनी केले आहे.

# थोडक्यात

## खापरखेडा येथे राजे छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

**अक्षराज : दिवाकर घेर**




**दि.१४, नागपूर :** राजे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात रेल्वे चौकी येथील संभाजी महाराज चौक खापरखेडा येथे साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात मुख्य अतिथी सैनिक देशरक्षक किशोर कोकाटे यांच्या हस्ते राजे छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी जयघोष करत छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्य, पराक्रम व हिंदवी स्वराज्यासाठी दिलेल्या अमूल्य योगदानाचे स्मरण केले.

या कार्यक्रमास विहिप बजरंग दलाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये नरेश मोरे, किशोर खोरगडे, छगन रहांगडाले, राजकुमार उके, बलराज बिरखेडे, संजयजी ठाकूर, राजेश पौनीकर, नितीन इंगोले, देवेंद्र ब्रम्हे, प्रवीण उंद्रे, शिवकुमार हरडे, विकास कौशल, सनी माहुरे, तरुण मित्तल, सुनील मते, मुकुल खोरगडे, राहुल तिवारी, लक्ष्मण कलसे, बबलू पन्नामी, गुणवंता पाल, रचित इंगोले, सार्थक इंगोले, प्रकाश बाळापुरे, रवी कोथळकर, जगत प्रसाद पांडे, गणेश बोहरूपी, श्रवण वाघ व नरेश कोरे यांचा समावेश होता.

तसेच मातृशक्ती दुर्गा वाहिनीच्या दिशा बिरखेडे, लता बसुले, पूजा चौरसिया, पौर्णिमा बिजोले, खुशबू ठाकूर, मालती राठोड, संगीता जैतवार, कांचन कबीरे, सुमन ठाकरे, सुनिता बांगरे, संतोषी रहांगडाले व अश्विनी तुमाने या उपस्थित होत्या. कार्यक्रमास समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून राजे छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन केले. संपूर्ण परिसर भगवामय वातावरणाने दुमदुमून गेला होता.

## कोक गाव आठ दिवसांपासून अंधारात; ग्रामस्थांचा संताप शिगेला

**अक्षराज : रहीम कोक्कर**



**दि.१४, जिंतूर (परभणी) :** जिंतूर तालुक्यातील कोक गावात मागील आठ दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने ग्रामस्थांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. कधी फॉल्ट, कधी २४ तास बत्ती गुल, तर कधी मेंटेनन्सच्या नावाखाली तासन्तास वीज बंद राहत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.गावातील नागरिकांनी स्थानिक प्रशासनासोबतच सरपंच व काही पुढाऱ्यांच्या भूमिकेवरही नाराजी व्यक्त केली आहे. गावात गंभीर वीज समस्या असताना लोकप्रतिनिधी फक्त आश्वासने देत आहेत; मात्र कायमस्वरूपी उपाययोजना दिसत नाही, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी दिली. विशेष म्हणजे, वीज व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याऐवजी प्रत्येक वेळी वेगवेगळी कारणे पुढे केली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला. गाव अंधारात असताना जबाबदार लोकांनी महावितरण अधिकाऱ्यांवर दबाव आणून प्रश्न सोडवणे अपेक्षित होते, असेही नागरिकांचे म्हणणे आहे. सततच्या वीज खंडितामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान, व्यापाऱ्यांचे व्यवहार ठप्प, पिण्याच्या पाण्याची समस्या आणि शेती पंप बंद पडल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. उष्णतेमुळे लहान मुले, महिला आणि वृद्ध नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, गावात आता वीज प्रश्न सोडवा अशी जोरदार मागणी होत असून, तातडीने उपाययोजना न झाल्यास ग्रामस्थ आक्रमक आंदोलन छेडण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.

## अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीचा शोध; पालकांच्या ताब्यात दिले

### ऑपरेशन मुस्कान अंतर्गत राहुरी पोलिसांची मोठी कामगिरी



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१४, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी तालुक्यातील एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीच्या अपहरण प्रकरणाचा छडा लावत राहुरी पोलिसांनी मुलीचा शोध घेऊन तिची सुखरूप सुटका केली असून तिला पालकांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई ऑपरेशन मुस्कान अभियानांतर्गत करण्यात आली. या अभियानात राहुरी पोलिसांनी आतापर्यंत तब्बल १०९ मुलींचा शोध घेऊन त्यांना पालकांच्या ताब्यात दिले आहे.

याबाबत माहिती अशी की, राहुरी तालुक्यातील १६ वर्षे ७ महिने वयाची अल्पवयीन मुलगी दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास घरातून कोणालाही काही न सांगता निघून गेली होती. ती परत न आल्याने मुलीच्या पालकांनी राहुरी पोलीस स्टेशन येथे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर ४४८/२०२६, बीएनएस कलम १३७(२), ८७ प्रमाणे अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता. सदर गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी सचिन दिलीप शिंदे (वय २८) यास दि. ११ मे २०२६ रोजी रात्री अटक करण्यात आली. पोलिसांनी विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने मित्राच्या मदतीने सदर मुलीला लग्न करण्याच्या उद्देशाने पळवून नेल्याची कबुली दिली. तपासादरम्यान मुलगी आश्वी पोलीस हद्दीत असल्याची माहिती पोहेकॉ राजू पुंड यांना आरोपीमार्फत मिळाली. त्यांनी ही माहिती तत्काळ पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांना दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपासी पथकाने दि.१३ मे २०२६ रोजी मुलीचा शोध घेत तिला राहुरी पोलीस स्टेशन येथे आणून पालकांच्या ताब्यात दिले. ही कारवाई पोलीस अधीक्षक सो.सुदर्शन मुम्मका, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय आर.ठेंगे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत पोहेकॉ राजू पुंड, पोहेकॉ रामनाथ सानप, पोलीस कॉन्स्टेबल गणेश मैड, पोहेकॉ सचिन धनाड, पोहेकॉ दरेकर व पोना वेताळ यांनी सहभाग घेतला.